## राज्य महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक

# गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** : राज्यात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राजय उत्कृष्ट सार्वजिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरांवर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या https://www.pldeshpandekalaacademy.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या https://ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे ऑनलाईन स्वरुपात स्वीकारले जाणार आहे. स्पर्धेचे अर्ज स्विकारण्याची अंतिम २५ ऑगस्ट, २०२५ असून, ही



स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे. यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिध्द गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्यावतीने तयार करण्यात आलेलय ganeshotsav.pldmka.co.in पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिध्द करता येईल. याकरिता अधिकाधिक मंडळांनी व कुटूंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे ganeshotsv.pldmka.com.in या पोर्टलद्वारे प्रसिध्द करावी व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता यावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम, गड किल्ले संवर्धन, राज्य व राष्ट्रीय स्मारकांचे जतन, विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन, देशी खेळांचे संवर्धन व प्रचार प्रसार, आरोग्य शिक्षण कला क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध विषयांवरील कार्य, कायमस्वरुपी सामाजिक व शैक्षणिक उपक्रम, वाचनालय, महिला सक्षमीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाच्या विज्ञानाच्या प्रचार व प्रसिध्दीचे कार्य, नवसंशोधन, पर्यावरण पूरक मूर्ती, सजावट व प्रदूषण रहित वातावरण अशा



विविध बाबींच्या आधारे परीक्षण केले जाणार आहे. या गणेशोत्सव स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांनी केले आहे.



## लातूर जिल्ह्यात युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध; टंचाई नाही

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यात सध्या ३४ हजार ३०५ मे. टन रासायनिक खते उपलब्ध असून, यापैकी ५४६ कृषी सेवा केंद्रांमध्ये ७ हजार १७ मे. टन युरिया खत उपलब्ध आहे. यामुळे जिल्ह्यात खतांची टंचाई नाही. शेतकऱ्यांना खतसाठ्याची माहिती https://adozplatur.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-0-padding.html?m=1 या ब्लॉगवर दररोज अद्ययावत केली जाते.

सोयाबीन पिकाचे जिल्ह्यात ४ लाख ८५ हजार १८२ हेक्टर क्षेत्र असून, हे पीक फुले लागणे ते शेंगा भरणे अवस्थेत आहे, त्यामुळे युरियाची गरज नाही. युरियाच्या वाढीव दराने विक्री किंवा टंचाईबाबत कोणतीही लिखित तक्रार नाही. जिल्ह्यात ७१३ कृषी सेवा केंद्रांची निरीक्षकांमार्फत तपासणी झाली असून, अनियमितता आढळलेल्या १५ दुकानांचे परवाने काही कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहेत. तसेच एका दुकानाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आला आहे.

युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. वाढीव दराने विक्री किंवा सक्तीच्या लिंकिंगच्या तक्रारी असल्यास शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, जिल्हा परिषद कृषी विभाग किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## आर्टीच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण नोंदणीला २८ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी** : अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (आर्टी) राज्यातील मातंग व त्यातील तत्सम जातीच्या उमेदवारांसाठी विविध स्पर्धा परीक्षांकरिता अनिवासी पूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरीता २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी दिली आहे.

मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग- म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा समाजातील जे उमेदवार १२ वी आणि पदवीधर परीक्षा उत्तीर्ण आहेत अशा पात्र उमेदवारांनी https://barticet.in/-RTI या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. २९ ते ३० ऑगस्ट २०२५ या दोन दिवसात उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जात दुरुस्ती व प्रिंट काढण्यासाठी देण्यात आले आहेत. त्यानंतर या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार बार्टी संस्थेमार्फत टीआरटीआय, सारथी, महाज्योती, आर्टी या संशोधन संस्थांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व अंमलबजावणी बार्टी संस्था करणार आहे.

**११ महिन्यासाठी स्पर्धा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण**

राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी ११ महिन्यांकरीता यूपीएससी, एमपीएससी राज्यसेवा, अराजपत्रित सेवा, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस), न्यायिक सेवा (जेएफएमसी) आणि सहा महिन्यांसाठी बँक (आयबीपीएस), कर्मचारी निवड आयोग (एसएससी), पोलीस- सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण खासगी नामांकित व्यवसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत देण्यात येणार आहे.

**प्रशिक्षण कालावधीकरीता विद्यावेतन**

प्रशिक्षण कालावधीत दर महिना सहा ते १३ हजार रुपये विद्यावेतन त्यासोबत पुस्तक संच, बुट व इतर खर्चाकरिता एकवेळ १२ ते १८ हजार रुपये अनुषांगिक लाभ देण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

## लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध बचत गटांकडून मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी अर्ज मागविले

**लातूर/प्रतिनिधी** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयानुसार, अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर आणि त्याची उपसाधने पुरवण्यासाठी योजना कार्यान्वित आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सन २०२५-२६ साठी लातूर जिल्ह्यातील पात्र बचत गटांना या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे. इच्छुक बचत गटांनी अर्ज भरून ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत समाज कल्याण सहाय्यक आयुक्त, लातूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे त्यांनी कळविले आहे.

## याचना ..

पूर ग्रस्त मदतीला
धावे कैक संघटना
दखल घेई गाभिर्ये
रोखू वेळी दुर्घटना

आम्ही मात्र हिंडतो
निघतो पूर पर्यटना
रिल्स बनवू लाईव्ह
कशा घडल्याघटना

टाळजरा बहिर्गमन
शासन पुरवे सूचना
दुर्लक्ष करे निर्लज्ज
हमेकुछ ना सोचना

भयावन दृश्ये सारी
चकित करी लोचना
पूर ग्रस्त त्रस्त झाले
का कळेना विवंचना

अडलानडला कुणी
मूकते करी याचना
नेते मख्ख थक्क ते
विसरे दिल्या वचना

वाट पाहे कुणास्तव
कुणी येई निर्मोचना
स्वता उभे पायावरी
नसे वारी अकिंचना

न उलगडणारे कोडे
निसर्ग करतो रचना
तू जागव माणुसकी
इश्वरासन्मुखअर्चना

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात फ्रेडरिक सँगर यांची १०७ वी जयंती उत्साहात साजरी

### विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधनाची प्रेरणा देणारा उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने नोबेल पुरस्कार विजेते आणि जगप्रसिद्ध बायोकेमिस्ट फ्रेडरिक सँगर यांची १०७ वी जयंती उत्साहपूर्वक साजरी करण्यात आली.विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा सन्मान करत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात गेली दोन वर्षे हा उपक्रम सातत्याने राबवण्यात येत आहे.संशोधनाची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो आहे.

कार्यक्रमाची सुरुवात विभागाच्या डॉ.फिरदोस बिरादार यांच्या हस्ते फ्रेडरिक सँगर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली.यावेळी बी.एस्सी.द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी अर्पिता गोरे हिने फ्रेडरिक सँगर यांचे वैज्ञानिक योगदान प्रभावीपणे उलगडून सांगितले.

फ्रेडरिक सँगर हे ब्रिटनमधील जागतिक कीर्तीचे बायोकेमिस्ट असून, रसायनशास्त्रातील दोन वेळा नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या काही मोजक्या शास्त्रज्ञांपैकी एक होते.१९५८ साली त्यांनी प्रथिन इन्सुलिनमधील अमिनो आम्लांचा अचूक क्रम निश्चित करून प्रथिनांना विशिष्ट रचना असते हे सिद्ध केले.यासाठी त्यांना प्रथम नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यानंतर १९८० साली त्यांनी विकसित केलेल्या सँगर पद्धतीमुळे डीएनएतील न्यूक्लिओटाइड्सचा क्रम शोधणे शक्य झाले.या क्रांतिकारी संशोधनामुळे आधुनिक जनुकशास्त्र,जैवतंत्रज्ञान आणि 'ह्युमन जीनोम प्रोजेक्ट' सारख्या महत्त्वपूर्ण संशोधन मोहिमांना चालना मिळाली.



त्यांच्या नम्र स्वभाव,साधेपणा आणि प्रयोगशाळेतील कार्यप्रेमी व्यक्तिमत्त्वामुळे ते विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरले.

कार्यक्रमावेळी जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा.अवंती बिडकर, प्रा.ऋतुजा डिग्रसकर,प्रा.अनुराधा शिंदे,प्रा.तृप्ती सोनकांबळे,प्रा. आऊ येळीकर यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी,पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाविद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करून संशोधनाची आवड निर्माण करणारा ठरत आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी** : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल च्या वतीने ७९ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी भारत सरकारच्या राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थान चे सदस्य तथा संवेदना प्रकल्प, लातूर चे संस्थापक कार्यवाह श्री सुरेश मनोहर पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी अमर जवान ज्योती स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून प्रमुख अतिथी यांच्यासमवेत मान्यवरांनी हुतात्म्यांना अभिवादन केले. विद्यालयाचे चेअरमन श्री आनंद लाहोटी जी, संस्थेचे सचिव आशिष बाजपाई जी, सह सचिव शरदकुमार नावंदर जी, विश्वस्त हुकूमचंद जी कलंत्री, संचालक चैतन्य जी भार्गव, विद्यालय समिती सदस्य स्नेहल जी उटगे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

विद्यालयातील चार रेजीमेंट छत्रपती शिवाजी महाराज हाउस, चाणक्य हाउस, सम्राट अशोका हाउस व आर्यभट हाउस च्या विद्यार्थ्यांनी परेड कमांडर नेतल सोनी च्या नेतृत्वात दिमाखदार पथ संचालन केले, प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी जय हो - संगीत कवायत सादर केली बेंड मेजर अस्मिता ३६ विद्यार्थ्यांच्या मिलिटरी घोष पथकाने विविध संरचनेतून घोष - कदम ताल यांचे प्रदर्शन केले. ५२ विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या संगीत समूहाकडून देशभक्तीपर गीतांनी व इयत्ता १० तील विद्यार्थीनींनी आपल्या नृत्य आविष्काराने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले तर सुस्वास्थ्य, सुदृढ व सक्षम भारत हा संदेश देत योग - जीम्नास्टिक्स - क्रीडा - साहसी खेळ - सूर्यनमस्कार आदींच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी माने जिंकली. यावेळी श्रुती गायकवाड



ने स्वदेशी व वैश्विक पटलावर भारत या विषयावर वक्तृत्व केले तर स्वरा भुतडा या इ ४ थीतील विद्यार्थिनीने 'ऑपरेशन सिंदूर' चे वर्णन आपल्या अनोख्या शैलीत सादर करून दाद मिळविली. यावेळी सत्र २०२४-२५ मधील बेस्ट रीडर अवनी पल्लोड, महविन सगरी, देविका चोले; वर्ग निहाय प्रथम स्थान अवनी पल्लोड इ ३, आरव बियाणी इ ४, चित्रा रायते इ ५, श्रीनाथ जाजू इ ६, ईशान तापडिया इ ७, बन्सील पटेल इ ८, स्वारीत खटोड इ ९, अबोली गोजमगुंडे इ १०, विश्ववर्धन चव्हाण इ १२; १००% उपस्थिती : समरजीत शिंदे, शौर्य माद्रेवार, अर्णव कातळे, रीयांश भोसले, प्रत्युषा गोडबोले, सुफीयान शेख, आदित्य बाजपाई, श्वेता बंडगर, अनुज गजरे, माहीर शेख, पर्व तोष्णीवाल, आदित्य राठी, अनुज कातळे, अपूर्व गटागट व इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेत ९० पेक्षा अधिक गुण घेणाऱ्या रविप्रसाद लोहिया, आनंदी अमोल इंदुलकर, आदित्य राजेंद्र बजाज, अथर्व निलेश अमले, रिद्धी रामकिशन बानापुरे%, श्रीनाथ विष्णुकांत राठी, श्रेया लक्ष्मण कोम्पले, मधुरा मंगेश कुलकर्णी, स्वराज संतोष तिडके, वैष्णवी सचिन बाजपाई, समृद्धी अरविंद फड, सफा झैद उस्ताद, विश्वजीत दत्तात्रय जाधव, वसुंधरा एकनाथ सुवर्णकार, अनुष्का अनिल वारद, विशाखा राजकुमार जाधव, अथर्व कैलास मुंदडा, श्लोक सुरेशराव भोर्गीर, रिषित विपिन बांगड, स्वरीत आशिष गेलडा, यश योगेश धूत, अमित काकासाहेब खोसे, सानवी राजशेखर बिडवे, ध्रुव आनंद सोमाणी, सिद्धी कृष्णकांत शिंदे, सानवी हावगीराव गोपचडे अर्जुन शीतल अग्रोया, शौर्य अमर देशमुख, इशान किशोर सोनी, आदित्य बलराम भुसे, श्रावणी संतोष बेंबळकर, राघव लक्षीनारायण सोमाणी, आर्यन संतोष झुंजे, सृष्टी कपिल शाह, गौरव पांडुरंग नरहरे, अथर्व श्रीशैल्य हालकुडे, विराज वेंकटेश नाईकवाडे, साधना चंद्रकांत तोडकर, वरूण नागोराव देशपांडे, संजीवनी कृष्णकुमार अग्रोया, आदिती संतोष भालेराव, नमन अमोल पत्तेवार, पर्ल हनुमंत अंतुरे, रोली राहुल अग्रवाल, अन्वय अजिंक्य गोजमगुंडे, संस्कृती गगन मालपाणी, अथर्व जितेंद्र मुंदडा, श्रीवेद पवन दुधानी, प्रषिक हनमंत गायकवाड, अंशुला हेमंत बियाणी, समर्थ सदाशिव अभंगे, अद्वैत मुगळीकर, गणेश निंबाळकर एकूण ८७ गुणवंत विद्यार्थ्यांना पालकांसमवेत स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

विकासाकडे वाटचाल करत असताना दिव्यांगजन हे प्रमुख प्रवाहात असले पाहिजेत हा आग्रह आपल्या कृतीतून दिसला पाहिजे, राष्ट्रभावनेने ओतप्रोत विद्यार्थी व आधुनिक शिक्षणा समवेत भारतीय संस्कारांचे बीजारोपण अतिशय योग्य पद्धतीने झाल्याचा प्रत्यय विद्यार्थ्यांचा सादरीकरनातून प्रकर्षाने जाणवून आला व पथ संचालन, क्रीडा संस्कृती, संगीत एकंदरीत सर्वांगीण विकसित विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आजचा स्वातंत्र्यदिन साजरा करता आला याचे समाधान असल्याचे सांगत स्वतंत्रता म्हणजे शौर्य अभिमान हा भारतीयांचा असून तो मिळवलेल्या बलिदानातून असल्याने तो कायम अभिमान भारतीयांच्या मनात राहील क्रांतीकारकाच्या बलिदानाची आठवण ठेवून आपण कृतज्ञ कृतिशील राहिले पाहिजे. राष्ट्र उन्नतीसाठी आदर्श नागरिक घडवण्याचे कार्य शिक्षणातूनच साध्य होते शिस्त जबाबदारी सहानुभूती राष्ट्रप्रेम राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्राचे अखंडत्व हे मूल्य शिक्षणातून साकारतात म्हणून विद्यालयांची भूमिका हि उन्नत - प्रगतीशील राष्ट्रासाठी महत्वाची आहे असे प्रमुख अतिथी श्री सुरेश पाटील यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य राठी, संध्या सोमाणी, स्वारीत खटोड व प्रतीक्षा मठपती यांनी केले.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६